निवडक



## निर्गुणा देवी नवीन मंदिराचा आज वर्धापनदिन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**आगोंद, दि. ९ :** आगोंद, काणकोण येथील श्री निर्गुणा देवी मंदिराचा पांचवा वर्धापन दिन सोमवार दि. १० रोजी सर्व धार्मिक विधी नुसार करण्यात येईल. सोमवारी सकाळी देवीस ब्राह्मणाडून अभिषेक, वांगडी, यजमान दाम्पत्य सेवा, होम हवन, नवचंडी, कुंकुमार्चन व संबंधित धार्मिक विधी केले जाईल. त्यानंतर दुपारी आरत्या, तीर्थप्रसाद व महाप्रसाद वितरण करण्यात येईल. सर्व महाजन व भक्तगणानी मोठ्या संख्येने या सोहळ्यास उपस्थित राहून देवीच्या कृपा प्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन श्री आगोंदेश्वर देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश नाईक गावकर व अन्य समिती पदाधिकाऱ्यांतर्फे करण्यात आले आहे.



मोपा : आर्थिक सहाय्य देताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. सोबत आमदार प्रवीण आर्लेकर.

## मोपा धनगर समाजाला आर्थिक सहाय्य

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पेडणे, दि. ९ :** निवडणूकपूर्व आश्वासन पाळताना आमदार प्रवीण आर्लेकर यांच्या प्रयत्क्याने मोपा विमानतळ पुनर्वसन प्रकल्पा अंतर्गत येणाऱ्या धनगर समाजातील खालील व्यक्तींना मुख्यमंत्र्या मारफत नागरी विमान वाहतूक संचालनालयातर्फे प्रत्येकी पाच लाख रुपयांचे घर दुरुस्तीसाठी आर्थिक सहाय्य व ओटीएस अंतर्गत पाण्याच्या बिलात सवलत देण्यात आली. गंगू वरक, मंदा वरक, विठू वरक, चिमणी वरक, सावित्री वरक, चंगू वरक, सोनू वरक, गीता खरावत, धाकू वरक, सिद्धु वरक व सोनू वरक उपस्तीत होते. माननीय मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या अंत्योदय तत्त्वाचे कौतुक व पेडणेच्या सर्वांगीण विकासासाठी सदोदित पूर्ण सहकार्य देण्याबद्दल आभार व्यक्त करतो.

# भारताचा इंग्लंडवर दणदणीत विजय

## भारताने केला इंग्लंडचा ४ गडी राखून पराभव : मालिकेत २-० अशी अजिंक्य आघाडी

**कटक, दि. ९ :**

कटकमध्ये खेळल्या गेलेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताने इंग्लंडचा ४ विकेट्सने पराभव केला. यासह, टीम इंडियाने तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत २-० अशी अभेद्या आघाडी घेतली आहे. भारतीय संघाच्या विजयाचा सर्वात मोठा हिरो रोहित शर्मा राहिले, ज्याने ९० चेंडूत ११९ धावांची शानदार आणि संस्मरणीय खेळी केली. त्याच्याशिवाय शुबमन गिलनेही अर्धशतकी खेळी करत संघाच्या विजयात मोठे योगदान दिले. त्याचबरोबर रवींद्र जडेजाने ही गोलंदाजीत ३ विकेट्स घेत महत्त्वाची भूमिका बजावली. यासह भारताने सलग सातव्यांदा मालिका विजय नोंदवला.

कटकमधील बाराबती स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेणाऱ्या इंग्लंडने बेन डकेट आणि जो रूट यांच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर ४९.५ षटकांत १० गडी गमावून ३०४ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात, रोहित शर्माच्या शतकाच्या जोरावर भारताने ४४.३ षटकांत सहा गडी गमावून ३०८ धावा केल्या आणि सामना जिंकला. लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या भारतीय संघाची सुरुवात चांगली झाली.रोहित शर्मा आणि शुबमन गिल यांनी पहिल्या विकेटसाठी १३६ धावांची भागीदारी केली, जी जेमी ओव्हरटनने तोडली.



ओव्हरटनने १७ व्या षटकात युवा फलंदाज गिलला बाद केले. २५ वर्षीय फलंदाज ५२ चेंडूत ६० धावा काढल्यानंतर पॅव्हेलियनमध्ये परतला. त्याने सलग दुसऱ्या सामन्यात अर्धशतक झळकावले. गिलने ४५ चेंडूत त्याच्या एकदिवसीय कारकिर्दीतील १५ वे अर्धशतक पूर्ण केले.तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आलेला विराट कोहली पुन्हा एकदा ऑफ स्टंपच्या बाहेर जाणाऱ्या चेंडूवर बाद झाला. आदिल रशीदने त्याला आपला बळी बनवले. तो फक्त पाच धावा करू शकला.

### रोहित शर्मा सचिन तेंडुलकरचा मोडला विक्रम

**रोहित शर्माने इंग्लंडविरूद्ध दुसऱ्या वनडे सामन्यात उत्कृष्ट फलंदाजी करत आपला फॉर्म परत मिळवला आहे. रोहित शर्माने ९० चेंडूत ७ षटकारांसह आणि १२ चौकारांसह ११९ धावांची उत्कृष्ट खेळी करत भारताच्या विजयाचा पाया रचला. रोहित शर्माने याशिवाय ३० चेंडूत रोहितने ५२ धावा करत तुफानी अर्धशतक झळकावले. रोहितने ५० धावा करताच सचिन तेंडुलकरच्या मोठ्या विक्रमाला गवसणी घातली. एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार ठोकणाऱ्या खेळाडूंच्या यादीत रोहित शर्माने ख्रिस गेलला मागे टाकले आहे. रोहितने आता २६७ सामन्यांच्या २५९ डावांमध्ये ३३८ षटकार ठोकले आहेत.**

**तिसऱ्या विकेटसाठी हिटमॅनसोबत ७० धावांची भागीदारी**

यानंतर श्रेयस अय्यरने पदभार स्वीकारला. त्याने तिसऱ्या विकेटसाठी हिटमॅनसोबत ७० धावांची भागीदारी केली. यादरम्यान, भारतीय कर्णधाराने ७६ चेंडूत त्याचे ३२ वे शतक पूर्ण केले. तो ९० चेंडूत १२ चौकार आणि सात षटकारांच्या मदतीने ११९ धावांची शानदार खेळी खेळून पॅव्हेलियनमध्ये परतला. डावाच्या ३० व्या षटकात लियाम लिव्हिंगस्टोनच्या चेंडूवर आदिल रशीदने त्याला झेलबाद केले.

इंग्लंडविरुद्ध, श्रेयस अय्यरने ४४, हार्दिक पंड्याने १०, अक्षर पटेलने नाबाद ४१ आणि रवींद्र जडेजाने ११ धावा केल्या. इंग्लंडकडून जेमी ओव्हरटनने दोन तर गस ॲटकिन्सन, आदिल रशीद आणि लियाम लिव्हिंगस्टोनने प्रत्येकी एक विकेट घेतली. आता दोन्ही संघांमधील तिसरा सामना १२ फेब्रुवारी रोजी अहमदाबादमध्ये खेळला जाईल. या सामन्यात भारतीय संघ इंग्लंडला विजयासह व्हाईटवॉश करण्याच्या उद्दिष्टाने मैदानात प्रवेश करेल.


# न्यूझीलंडचा पाकिस्तानवर ७८ धावांनी पराभव

**नवी दिल्ली, दि. ९ :**

न्यूझीलंडविरुद्धच्या तिरंगी मालिकेतील पहिल्या सामन्यात पाकिस्तानी संघाला ७८ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. या सामन्यात पाकिस्तानकडून गोलंदाज आणि फलंदाज चांगली कामगिरी करू शकले नाहीत. न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी केली आणि पाकिस्तानला ३३१ धावांचे लक्ष्य दिले, ज्याच्या प्रत्युत्तरात पाकिस्तानला फक्त २५२ धावा करता आल्या. फखर झमानने पाकिस्तानसाठी निश्चितच लढाऊ खेळी केली, पण तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. ग्लेन फिलिप्सच्या शतकाने फखरच्या डावावर सावली टाकली.

मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या पाकिस्तानी संघाची सुरुवात खराब झाली. बाबर आझम फक्त १० धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. दुसरीकडे, फखर झमानने दमदार खेळी केली. त्याने ६९ चेंडूत ८४ धावा केल्या, ज्यात % चौकार आणि चार षटकारांचा समावेश होता. त्याला इतर फलंदाजांकडून साथ मिळाली नाही. कामरान गुलाम आणि कर्णधार मोहम्मद रिझवान यांनाही चांगली कामगिरी करता आली नाही. सलमान अली आघाने काही वेळ विकेटवर राहण्याचा प्रयत्न केला, ज्यात त्याने ४० धावा केल्या. अबरार अहमदने २३ धावांची खेळी केली. दुखापतीमुळे हरिस रौफ फलंदाजीला आला नाही. अशाप्रकारे फलंदाजांच्या खराब कामगिरीमुळे पाकिस्तानला पराभवाचा सामना करावा लागला. न्यूझीलंडकडून मिचेल सँटनर आणि मॅट हेन्री यांनी प्रत्येकी ३ विकेट घेतल्या.

एकेकाळी किवी संघाने फक्त ३९ धावांमध्ये दोन विकेट गमावल्या होत्या. पण यानंतर डॅरिल मिशेल आणि ग्लेन फिलिप्स यांनी धावा काढण्याची जबाबदारी घेतली. मिशेलने ८१ धावा केल्या. तर फिलिप्सने त्याच्या कारकिर्दीतील पहिले एकदिवसीय शतक झळकावले. त्याने %४ चेंडूत १०६ धावा केल्या, ज्यात ६ चौकार आणि % षटकारांचा समावेश होता. त्याच्याशिवाय अनुभवी फलंदाज केन विल्यमसनने ५८ धावांचे योगदान दिले. या खेळाडूंच्या उत्कृष्ट खेळीमुळे न्यूझीलंड संघाला ३३० धावांचा टप्पा गाठण्यात यश आले. शाहीन आफ्रिदीविरुद्ध ५० व्या षटकात ग्लेन फिलिप्सने एकूण २५ धावा कुटल्या. तो सामन्यात खूप महागडा ठरला. त्याने १० षटकांत एकूण ८८ धावा दिल्या.




RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १५८ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 158 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .